# प्रेसनोट दि. १७/०६/२०१९

## दोन सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायातुन सुटका ....

दिनांक १५/६/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना बातमी मिळाली की, सिंहगड रोड पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील न-हे ब्रिज समोर, वडगाव बु// या ठिकाणी दोन एजंट वेश्या व्यवसाया करीता मुलींना घेवुन येणार असले बाबत खात्रीशीर बातमी मिळाली. सदर बातमीचीचे अनुषंगाने श्री. भानुप्रताप बर्गे सहा पोलीस आयुक्त, गुन्हे -२ यांचे मार्गदर्शनाखाली छापा कारवाई करुन वेश्या व्यवसायातील दलाल नामे १) शाम ऊर्फ राम पांडुरंग बोरुळे वय २७ वर्षे रा. भैरवनाथ नगर, किरकटवाडी, ता हवेली जि पुणे २) नयन पदम नरवडे वय २४ वर्षे रा. सुंदर सोसायटी, हांडेवाडी पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातील दोन सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायातुन सुटका केली आहे.

वरील नमुद कारवाई ही मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, व कर्मचारी नामदेव शेलार, राजाराम घोगरे, सचिन शिंदे, महिला पोलीस कर्मचारी स्वामी यांचे पथकाने केली आहे.